SMBT

नवी आशा नवी दिशा

सार्वमत

epaper.deshdoot.com
16 Dec 2024 - Page 10

# सहकारमहर्षी थोरातांच्या जन्मशताब्दीनिमित्त महाआरोग्य अभियान

## एसएमबीटी हॉस्पिटलच्यावतीने एकाच छताखाली तपासणी व सल्ला

**संगमनेर (प्रतिनिधी)** – सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या जन्मशताब्दी निमित्ताने काँग्रेस नेते, माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली संगमनेर तालुक्यातील सर्वसामान्य व आर्थिक दुर्बल घटकातील नागरिकांसाठी १ जानेवारी २०२५ पासून शहर व तालुक्यातील सर्व गावांमध्ये महाआरोग्य शिबीर राबविण्यात येणार आहे. या अंतर्गत विविध आजारांची तपासणी तज्ज्ञ डॉक्टरांकडून केली जाणार आहे. या शिबिरात आढळणाऱ्या रुग्णांना पुढील उपचारांसाठी एसएमबीटी सेवाभावी हॉस्पिटलच्या माध्यमातून मोफत आणि अल्पदरात उपचार करण्यात येणार असल्याची माहिती जयहिंद लोकचळवळीचे संस्थापक तथा माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांनी दिली.




या आरोग्य शिबिराबाबत अधिक माहिती देताना डॉ.तांबे म्हणाले, एसएमबीटीसेवाभावी हॉस्पिटलच्यावतीने राज्यातील २७ जिल्ह्यांसह संगमनेर तालुक्यातील गोरगरीब, ऊसतोड कामगार, आदिवासी व सर्वसामान्य नागरिकांना मोफत व माफक दरात उच्च दर्जाच्या आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. हे वर्ष सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांचे जन्मशताब्दी वर्ष असल्याने एसएमबीटी हॉस्पिटल, आयएमए, निमा, संगमनेर तालुका मेडिकल प्रॅक्टिशनर असोसिएशन, शहरातील व ग्रामीण भागातील अनेक नामांकित डॉक्टर्स व हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने १ जानेवारी २०२५ पासून शहर व तालुक्यात या महाआरोग्य तपासणी व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये जन्मजात हृदयविकार, हृदयविकार, कर्करोग, मूत्रविकार, किडनी व डायलिसीस, जनरल शस्त्रक्रिया, अस्थिरोग, सांधेदुखी, पोटदुखी, हाडांचे आजार, स्त्रियांचे आजार, पोटविकार शस्त्रक्रिया, दंत तपासणी, नेत्ररोग तपासणी आदी उपचार होणार आहेत.

याचबरोबर आजाराचे निदान झाल्यानंतर त्यांच्यावर उपचार केले जाणार असून ज्यांच्यावर संगमनेरमध्ये उपचार करणे शक्य नाही त्यांना नंदीहिल येथील एसएमबीटी हॉस्पिटल येथे उपचार केले जाणार आहेत. हे महाआरोग्य शिबीर तालुक्यात विविध ठिकाणी होणार असून यामध्ये त्या परिसरातील स्थानिक डॉक्टर, निमा, आयएमए, संगमनेर तालुका मेडिकल प्रॅक्टिशनर असोसिएशन व आरोग्य सेवेतील कार्यकर्ते सहभागी होणार आहेत. या शिबिरातून सर्व तरुण, नागरिक, शेतकरी व महिला या सर्वांनी स्वतःची आरोग्य तपासणी व रोगनिदान करून घ्यावे , असे आवाहन एसएमबीटी सेवाभावी ट्रस्ट व यशोधन कार्यालयाच्यावतीने करण्यात आले आहे.

### हॉस्पिटलला रुग्णाला 'ये-जा'ची मोफत सुविधा..

संगमनेर तालुक्यात होत असलेल्या महाआरोग्य शिबिरातून ज्या व्यक्तींवर उपचार करणे गरजेचे आहे. अशा सर्व व्यक्तींना एसएमबीटी हॉस्पिटलला जाण्या-येण्याची मोफत सुविधा करण्यात आली असून सर्वांनी आपली आरोग्य तपासणी करून घ्यावी, असे आवाहन कर्करोगतज्ज्ञ डॉ. जयश्री थोरात यांनी केले आहे.

नवराष्ट्र
www.navarashtra.com

MBT

**रुग्णांना आधार • 'एसएमबीटी'च्या वतीने अनेक आजारांसाठी एकाच छताखाली तपासणी**

# थोरातांची जन्मशताब्दी; आरोग्य शिबिर

संगमनेर, (वा.) सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या जन्मशताब्दी निमित्ताने काँग्रेस नेते, माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली संगमनेर तालुक्यातील सर्वसामान्य व आर्थिक दुर्बल घटकातील नागरिकांसाठी १ जानेवारी पासून संगमनेर शहर व तालुक्यातील सर्व गावांमध्ये महाआरोग्य शिबिर राबविण्यात येणार आहे. या अंतर्गत विविध आजारांची तपासणी तज्ज्ञ डॉक्टरांकडून केली जाणार आहे. या शिबिरात आढळणाऱ्या रुग्णांना पुढील उपचारासाठी एसएमबीटी सेवाभावी हॉस्पिटलच्या माध्यमातून मोफत आणि अल्पदरात उपचार करण्यात येणार असल्याची माहिती जयहिंद लोकचळवळीचे संस्थापक माजी आ. डॉ. सुधीर तांबे यांनी दिली.




## अभियानास यांचे मिळणार सहकार्य

डॉ. तांबे म्हणाले, एसएमबीटी सेवाभावी हॉस्पिटलच्या वतीने राज्यातील २७ जिल्ह्यासह संगमनेर तालुक्यातील गोरगरीब, ऊसतोड कामगार, आदिवासी व सर्वसामान्य नागरिकांना मोफत व माफक दरात उच्च दर्जाच्या आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. हे वर्ष सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांचे जन्मशताब्दी वर्ष असल्याने एसएमबीटी हॉस्पिटल, आयएमए, निमा, संगमनेर तालुका मेडिकल प्रॅक्टिशनर असोसिएशन, शहरातील व ग्रामीण भागातील अनेक नामांकित डॉक्टर्स व हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

## या आजारांवर होणार आहेत उपचार

यामध्ये जन्मजात हृदयविकार, हृदयविकार, कर्करोग, मूत्रविकार, किडनी व डायलिसीस, जनरल शस्त्रक्रिया, अस्थिरोग, सांधेदुखी, पोटदुखी, हाडांचे आजार, स्त्रियांचे आजार, पोटविकार शस्त्रक्रिया, दंत तपासणी, नेत्ररोग तपासणी व उपचार होणार आहे. याचबरोबर आजाराचे निदान झाल्यानंतर त्यांच्यावर उपचार केले जाणार असून ज्यांच्यावर संगमनेरमध्ये उपचार करणे शक्य नाही त्यांच्यावर नंदी हिल येथील एसएमबीटी हॉस्पिटल येथे उपचार केले जाणार आहेत.

## येण्या-जाण्याची मोफत सुविधा

संगमनेर तालुक्यात होत असलेल्या महाआरोग्य शिबिरातून ज्या व्यक्तींवर उपचार करणे गरजेचे आहे. अशा सर्व व्यक्तींना एसएमबीटी हॉस्पिटलला जाण्या-येण्याची मोफत सुविधा करण्यात आली आहे. त्यामुळे या शिबिरातील नागरिकांना मोठा लाभ मिळणार असल्याने सर्वांनी आपली आरोग्य तपासणी करून घ्यावी, असे आवाहन कॅन्सरतज्ज्ञ डॉ. थोरात यांनी केले आहे.

Ahmednagar Plus Edition
Dec 16, 2024 Page No. 4

नवी आशा नवी दिशा
सार्वमत
epaper.deshdoot.com
21 Jan 2025 - Page 04

SMBT

# ‘एसएमबीटी’च्या शिबिरास नागरिकांचा उदंड प्रतिसाद

## जन्मशताब्दी महोत्सवानिमित्त महाआरोग्य शिबिराचे आयोजन

**संगमनेर (प्रतिनिधी)** – सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या जन्मशताब्दीनिमित्त एसएमबीटी हॉस्पिटलच्यावतीने संगमनेर शहरातील प्रभाग एकमधील पी. जे. आंबरे पाटील कन्या विद्यालयात महाआरोग्य तपासणी व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरास नागरिकांचा उदंड प्रतिसाद मिळाला. या शिबिरात मोफत उपचार घेण्यासाठी सकाळपासून अनेक रुग्णांनी गर्दी केली होती. अनेक रुग्णांवर शिबिरस्थळी उपचार करण्यात आले तर पुढील उपचारांची आवश्यकता असलेल्या रुग्णांवर इगतपुरी तालुक्यातील नंदीहिल्स येथील एसएमबीटी हॉस्पिटल येथे उपचारांसाठी नेण्याचा सल्ला तज्ज्ञांकडून देण्यात आला.



या शिबिरास काँग्रेसच्या राष्ट्रीय कार्यकारिणी समितीचे सदस्य तथा माजी मंत्री बाळासाहेब थोरात, जयहिंद लोकचळवळीचे संस्थापक तथा माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, माजी नगराध्यक्षा दुर्गा तांबे यांच्यासह शहरातील विविध मान्यवरांनी भेट दिली. एसएमबीटी सेवाभावी ट्रस्टच्या माध्यमातून गोरगरिबांच्या आरोग्यासाठी विविध उपक्रम राबवले जात आहेत. सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या जयंती शताब्दीनिमित्ताने संगमनेर शहर आणि तालुक्यात विविध ठिकाणी हे महाआरोग्य शिबीर होत आहे. यामध्ये विविध आजारांचे निदान व त्यावर उपचार होणार असल्याने या शिबिराचा जास्तीत-जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले.

या शिबिरात जन्मजात हृदयविकार, हृदयविकार शस्त्रक्रिया, प्रतिबंधात्मक कर्करोग, मूत्रविकार, किडनी व डायलिसीस, जनरल शस्त्रक्रिया, अस्थिरोग, सांधेदुखी, पोटदुखी, हाडांचे आजार, स्त्रियांचे आजार, नेत्ररोग तपासणी, उपचार तसेच आयुर्वेद हॉस्पिटलच्यावतीने देखील विविध आजारांवरील रुग्णांची तपासणी करण्यात आली. याप्रसंगी एसएमबीटी सेवाभावी संस्थेचे बोर्ड सदस्य श्रीराम कुऱ्हे, अधिष्ठाता डॉ. मीनल मोहगावकर, चीफ ऑपरेटिंग ऑफिसर सचिन बोरसे यांसह अनेक वरिष्ठ तज्ज्ञांची उपस्थिती होती. शिबिराच्या मुख्य समन्वयक म्हणून डॉ. अश्विनी देशमुख यांनी काम पाहिले. एसएमबीटी दंत महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी शिबिराच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.

# सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या जन्मशताब्दी निमित्त रविवारी महाआरोग्य शिबिर

## एसएमबीटी हॉस्पिटलच्या वतीने स्पेशालिटी आणि सुपरस्पेशालिटी आजारांसाठी एकाच छताखाली तपासणी व सल्ला मार्गदर्शन

संगमनेर-सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या जन्मशताब्दी निमित्ताने काँग्रेस पक्षाचे नेते माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली संगमनेर शहरातील नागरिकांसाठी रविवार (दि. १९) पासून महाआरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे. १० पेक्षा अधिक प्रभागात या महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले असून जास्तीत जास्त नागरिकांनी शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.या शिबिराअंतर्गत तज्ञ डॉक्टरांकडून विविध आजारांची तपासणी केली जाणार आहे. या शिबिरात आढळणा?या रुग्णांना पुढील उपचारासाठी एसएमबीटी सेवाभावी हॉस्पिटलमध्ये उपचार करण्यात येणार असल्याची माहिती जयहिंद लोकचळवळीचे संस्थापक मा.आमदार डॉ सुधीर तांबे यांनी दिली.या आरोग्य शिबिराबाबत अधिक माहिती देताना माजी आमदार डॉ तांबे म्हणाले की, तालुक्यातील गोरगरीब ऊसतोड कामगार सर्वसामान्य नागरिक यांच्या आरोग्य सुविधांसाठी सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांनी दूरदृष्टीतून एसएमबीटी सेवाभावी ट्रस्टची स्थापना केली. माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली एसएमबीटी हॉस्पिटलच्या माध्यमातून सातत्याने आदिवासी गोरगरीब व सर्वसामान्य नागरिकांसाठी मोफत व माफक दरात उच्च दर्जाच्या आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांची जन्मशताब्दी पूर्ण झाल्याने एसएमबीटी हॉस्पिटलच्या माध्यमातून रविवारपासून संगमनेर शहरातील प्रभाग एकमधील पीजे आंबरेपाटील कन्या विद्यालयात महाआरोग्य तपासणी व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.या शिबिरात जन्मजात हृदयविकार, हृदयविकार शस्त्रक्रिया, प्रतिबंधात्मक कर्करोग, मूत्रविकार, किडनी व डायलिसीस, जनरल शस्त्रक्रिया, अस्थिरोग, सांधेदुखी, पोटदुखी, हाडांचे आजार स्त्रियांचे आजार, नेत्ररोग तपासणी व उपचार तसेच आयुर्वेद हॉस्पिटलच्या वतीने देखील विविध आजारांवरील रुग्णांची तपासणी केली जाणार आहे.आजाराचे निदान झाल्यानंतर ज्या रुग्णांवर संगमनेर मध्ये उपचार करणे शक्य नाही अशा रुग्णांवर नंदी हिल्स येथील एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये उपचार केले जाणार आहेत. हे महाआरोग्य शिबिर शहरासह, तालुक्यात विविध ठिकाणी होणार असून या शिबिरातून सर्व तरुण, नागरिक, शेतकरी, महिला या सर्वांनी स्वतःची आरोग्य तपासणी व रोग निदान करून घ्यावे असे आवाहनही त्यांनी केले आहे. शहरात एकूण १० पेक्षा अधिक ठिकाणी वेगवेगळ्या दिवशी या शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. या महाआरोग्य शिबिरातून ज्या रुग्णांना पुढील उपचारासाठी एसएमबीटी हॉस्पिटल येथे नेण्याची मोफत सोय करण्यात आली आहे. शिबिरातील नागरिकांना मोठा लाभ मिळणार आहे. तज्ञ डॉक्टरांच्या उपस्थित होत असलेल्या आरोग्य तपासणी शिबिरात जास्तीत जास्त नागरिकांनी तपासणी करून घ्यावी असे आवाहन एसएमबीटी हॉस्पिटल च्या वतीने करण्यात आले आहे

# एसएमबीटी हॉस्पिटलच्या वतीने आयोजित शिबिरास नागरिकांचा उदंड प्रतिसाद

या शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. १० पेक्षा अधिक प्रभागांमधील नागरिकांची मोफत आरोग्यतपासणी केली जाणार असल्याची माहिती याप्रसंगी देण्यात आली. या शिबिरास काँग्रेसच्या राष्टीय वर्किंग कमिटीचे सदस्य तथा माजी मंत्री बाळासाहेब थोरात, जयहिंद लोकचळवळीचे संस्थापक मा.आमदार डॉ सुधीर तांबे, माजी नगराध्यक्षा दुर्गाताई तांबे, यांच्यासह शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवरांनी या शिबिरास भेट दिली.यावेळी माजी मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, एस एम बी टी सेवाभावी ट्रस्टच्या माध्यमातून गोरगरिबांच्या आरोग्यासाठी विविध उपक्रम राबवले जात आहेत सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या जयंती शताब्दीच्या निमित्ताने संगमनेर शहर आणि तालुक्यात विविध ठिकाणी हे महाआरोग्य शिबिर होत आहे यामध्ये विविध आजारांचे निदान व त्यावर उपचार होणार असल्याने या शिबिराचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी केले. तर डॉ तांबे म्हणाले की, तालुक्यातील गोरगरीब ऊसतोड कामगार सर्वसामान्य नागरिक यांच्या आरोग्य सुविधांसाठी सहकार महषी भाऊसाहेब थोरात यांनी दूरदृष्टीतून एसएमबीटी सेवाभावी ट्रस्टची स्थापना केली. माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली एसएमबीटी हॉस्पिटलच्या माध्यमातून सातत्याने आदिवासी गोरगरीब व सर्वसामान्य नागरिकांसाठी मोफत व माफक दरात उच्च दर्जाच्या आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. मोफत आणि परवडणाऱ्या आरोग्यसुविधा पुरवणारे एसएमबीटी हॉस्पिटलचा नावलौकिक महाराष्ट्रभरात आहे. राज्याच्या कानाकोपरयातून अनेक रुग्ण याठिकाणी उपचारासाठी दाखल होत आहेत. आपल्या शहरातील नागरिकांनादेखील मोफत उपचारांचा लाभ मिळावा या उदात्त हेतून अशा शिबिरांचे आयोजन करण्यात येते. या शिबिरात जन्मजात हृदयविकार, हृदयविकार शस्त्रक्रिया, प्रतिबंधात्मक कर्करोग, मूत्रविकार, किडनी व डायलिसीस, जनरल शस्त्रक्रिया, अस्थिरोग, सांधेदुखी, पोटदुखी, हाडांचे आजार स्त्रियांचे आजार, नेत्ररोग तपासणी व उपचार तसेच आयुर्वेद हॉस्पिटलच्या वतीनेदेखील विविध आजारांवरील रुग्णांची तपासणी करण्यात आली. याप्रसंगी एसएमबीटी सेवाभावी संस्थेचे बोर्ड मेंबर श्रीराम कुन्हे, अधिष्ठाता डॉ. मीनल मोहगावकर, चीफ ऑपरेटिंग ऑफिसर सचिन बोरसे यांच्यासह अनेक वरिष्ठ तज्ञांची उपस्थिती होती. शिबिराच्या मुख्य समन्वयक म्हणून डॉ अश्विनी देशमुख यांनी काम पहिले. एसएमबीटी दंत महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी शिबिराच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.

BT

नवराष्ट्र

www.navarashtra.com

आरोग्य • एसएमबीटी हॉस्पिटलच्या वतीने आयोजित शिबिरास नागरिकांचा मिळाला प्रतिसाद

# दर रविवारी होणार महाआरोग्य शिबिर

संगमनेर, (प्र.) सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या जन्मशताब्दी निमित्त एसएमबीटी हॉस्पिटलच्या वतीने शहरातील प्रभाग एक मधील पीजे आंबरे पाटील कन्या विद्यालयात महाआरोग्य तपासणी व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरास शहरातील नागरिकांचा उदंड असा प्रतिसाद मिळाला. या शिबिरात मोफत उपचार घेण्यसाठी सकाळपासून अनेक रुग्णांनी गर्दी केली होती. अनेक रुग्णांवर शिबिरस्थळी उपचार करण्यात आले तर पुढील उपचारांची आवश्यकता असलेल्या रुग्णांवर इगतपुरी तालुक्यातील नंदी हिल्स येथील एसएमबीटी हॉस्पिटल येथे उपचारांसाठी नेण्याचा सल्ला तज्ञांकडून देण्यात आला.

शहरातील नागरिकांच्या निरोगी आरोग्यासाठी दर रविवारी विविध प्रभागात या शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. १० पेक्षा अधिक प्रभागांमधील नागरिकांची मोफत आरोग्यतपासणी केली जाणार असल्याची माहिती याप्रसंगी देण्यात आली.

या शिबिरास कॉंग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य तथा माजी मंत्री बाळासाहेब थोरात, जयहिंद लोकचळवळीचे संस्थापक मा.आमदार डॉ सुधीर तांबे, माजी नगराध्यक्षा दुर्गाताई तांबे, यांच्यासह शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवरांनी या शिबिरास भेट दिली.



## नागरिकांनी लाभ घ्यावा

यावेळी माजी मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, एस एम बी टी सेवाभावी ट्रस्टच्या माध्यमातून गोरगरिबांच्या आरोग्यासाठी विविध उपक्रम राबवले जात आहेत सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या जयंती शताब्दीच्या निमित्ताने संगमनेर शहर आणि तालुक्यात विविध ठिकाणी हे महाआरोग्य शिबिर होत आहे यामध्ये विविध आजारांचे निदान व त्यावर उपचार होणार असल्याने या शिबिराचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी केले.

## सर्वसामान्य नागरिकांसाठी उपचार

डॉ तांबे म्हणाले की, तालुक्यातील गोरगरीब ऊसतोड कामगार सर्वसामान्य नागरिक यांच्या आरोग्य सुविधांसाठी सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांनी दूरदृष्टीतून एसएमबीटी सेवाभावी ट्रस्टची स्थापना केली. माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली एसएमबीटी हॉस्पिटलच्या माध्यमातून सातत्याने आदिवासी गोरगरीब व सर्वसामान्य नागरिकांसाठी मोफत व माफक दरात उच्च दर्जाच्या आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

## विविध आजारांवरील तपासणी

या शिबिरात जन्मजात हृदयविकार, हृदयविकार शस्त्रक्रिया, प्रतिबंधात्मक कर्करोग, मूत्रविकार, किडनी व डायलिसीस, जनरल शस्त्रक्रिया, अस्थिरोग, सांधेदुखी, पोटदुखी, हाडांचे आजार स्त्रियांचे आजार, नेत्ररोग तपासणी व उपचार तसेच आयुर्वेद हॉस्पिटलच्या वतीनेदेखील विविध आजारांवरील रुग्णांची तपासणी करण्यात आली. याप्रसंगी एसएमबीटी सेवाभावी संस्थेचे बोर्ड मेंबर श्रीराम कुऱ्हे, अधिष्ठाता डॉ. मीनल मोहगावकर, चीफ ऑपरेटिंग ऑफिसर सचिन बोरसे यांच्यासह अनेक वरिष्ठ तज्ञांची उपस्थिती होती. शिबिराच्या मुख्य समन्वयक म्हणून डॉ अश्विनी देशमुख यांनी काम पहिले.

Ahmednagar Plus Edition
Jan 21, 2025 Page No. 4
Powered by: Navarashtra.com

लोकमत

# एसएमबीटी हॉस्पिटलच्या वतीने आयोजित शिबिरास प्रतिसाद

लोकमत न्यूज नेटवर्क

संगमनेर : सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या जन्मशताब्दीनिमित्त एसएमबीटी हॉस्पिटलच्या वतीने सोमवारी शहरातील प्रभाग एकमधील पीजे आंबरे पाटील कन्या विद्यालयात महाआरोग्य तपासणी व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरास शहरातील नागरिकांचा उदंड प्रतिसाद मिळाला. या शिबिरात मोफत उपचार घेण्यासाठी सकाळपासून अनेक रुग्णांनी गर्दी केली होती. अनेक रुग्णांवर शिबिरस्थळी उपचार करण्यात आले, तर पुढील उपचारांची आवश्यकता असलेल्या रुग्णांवर इगतपुरीतील नंदी हिल्स येथील एसएमबीटी हॉस्पिटल येथे उपचारासाठी नेण्याचा सल्ला तज्ज्ञांकडून देण्यात आला.

शहरातील नागरिकांच्या निरोगी आरोग्यासाठी दर रविवारी विविध



प्रभागात या शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. १० पेक्षा अधिक प्रभागांमधील नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी केली जाणार असल्याची माहिती याप्रसंगी देण्यात आली. या शिबिरास माजी मंत्री बाळासाहेब थोरात, माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, माजी नगराध्यक्षा दुर्गाताई तांबे यांच्यासह शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवरांनी या शिबिरास भेट दिली. (वा.प्र.)

Ahmednagar Main
Page No. 4 Jan 21, 2025
Powered by: erelego.com

# एसएमबीटी हॉस्पिटलच्या वतीने आयोजित शिबिरास नागरिकांचा उदंड प्रतिसाद

## सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या जन्मशताब्दी निमित्त महाआरोग्य शिबिर संपन्न

संगमनेर( प्रतिनिधी)सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या जन्मशताब्दी निमित्त एसएमबीटी हॉस्पिटलच्या वतीने आज शहरातील प्रभाग एक मधील पीजे आंबरे पाटील कन्या विद्यालयात महाआरोग्य तपासणी व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरास शहरातील नागरिकांचा उदंड असा प्रतिसाद मिळाला. या शिबिरात मोफत उपचार घेण्यसाठी सकाळपासून अनेक रुग्णांनी गदी केली होती.



अनेक रुग्णांवर शिबिरस्थळी उपचार करण्यात आले तर पुढील उपचारांची आवश्यकता असलेल्या रुग्णांवर इगतपुरी तालुक्यातील नंदी हिल्स येथील एसएमबीटी हॉस्पिटल येथे उपचारांसाठी नेण्याचा सल्ला तज्ज्ञांकडून देण्यात आला. अधिक माहिती अशी की, शहरातील नागरिकांच्या निरोगी आरोग्यासाठी दर रविवारी विविध प्रभागात (पान ४ वर )

SMBT

# सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या जन्मशताब्दी निमित्त महाआरोग्य शिबिर संपन्न

संगमनेर-सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या जन्मशताब्दी निमित्त एसएमबीटी हॉस्पिटलच्या वतीने आज शहरातील प्रभाग एक मधील पीजे आंबरे पाटील कन्या विद्यालयात महाआरोग्य तपासणी व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरास शहरातील नागरिकांचा उदंड असा प्रतिसाद मिळाला. या शिबिरात मोफत उपचार घेण्यसाठी सकाळपासून अनेक रुग्णांनी गर्दी केली होती. अनेक रुग्णांवर शिबिरस्थळी उपचार करण्यात आले तर पुढील उपचारांची आवश्यकता असलेल्या रुग्णांवर इगतपुरी तालुक्यातील नंदी हिल्स येथील एसएमबीटी हॉस्पिटल येथे उपचारांसाठी नेण्याचा सल्ला तज्ञांकडून देण्यात आला. अधिक माहिती अशी की, शहरातील नागरिकांच्या निरोगी आरोग्यासाठी दर रविवारी विविध प्रभागात या शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. १० पेक्षा अधिक प्रभागांमधील नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी केली जाणार असल्याची माहिती याप्रसंगी देण्यात आली. या शिबिरास कॉंग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य तथा माजी मंत्री बाळासाहेब थोरात, जयहिंद लोकचळवळीचे संस्थापक मा.आमदार डॉ सुधीर तांबे, माजी नगराध्यक्षा दुर्गाताई तांबे, यांच्यासह शहरातील विविध क्षेत्रातील





गोरगरिबांच्या आरोग्यासाठी विविध उपक्रम राबवले जात आहेत सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या जयंती शताब्दीच्या निमित्ताने संगमनेर शहर आणि तालुक्यात विविध ठिकाणी हे महाआरोग्य शिबिर होत आहे यामध्ये विविध आजारांचे निदान व त्यावर उपचार होणार असल्याने या शिबिराचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी केले. तर डॉ तांबे म्हणाले की, तालुक्यातील गोरगरीब ऊसतोड कामगार सर्वसामान्य नागरिक यांच्या आरोग्य सुविधांसाठी सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांनी दूरदृष्टीतून एसएमबीटी सेवाभावी ट्रस्टची स्थापना केली. माजी मंत्री बाळासाहेब

सातत्याने आदिवासी गोरगरीब व सर्वसामान्य नागरिकांसाठी मोफत व माफक दरात उच्च दर्जाच्या आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. मोफत आणि परवडणाऱ्या आरोग्यसुविधा पुरवणारे एसएमबीटी हॉस्पिटलचा नावलौकिक महाराष्ट्रभरात आहे. राज्याच्या कानाकोपरयातून अनेक रुग्ण याठिकाणी उपचारासाठी दाखल होत आहेत. आपल्या शहरातील नागरिकांनादेखील मोफत उपचारांचा लाभ मिळावा या उदात्त हेतून अशा शिबिरांचे आयोजन करण्यात येते. या शिबिरात जन्मजात हृदयविकार, हृदयविकार शस्त्रक्रिया, प्रतिबंधात्मक कर्करोग, मूत्रविकार, किडनी व डायलिसीस, जनरल शस्त्रक्रिया, अस्थिरोग, सांधेदुखी, पोटदुखी, हाडांचे आजार स्त्रियांचे आजार, नेत्ररोग तपासणी व उपचार तसेच आयुर्वेद हॉस्पिटलच्या वतीनेदेखील विविध आजारांवरील रूग्णांची तपासणी करण्यात आली. याप्रसंगी एसएमबीटी सेवाभावी संस्थेचे बोर्ड मेंबर श्रीराम कुऱ्हे, अधिष्ठाता डॉ. मीनल मोहगावकर, चीफ ऑपरेटिंग ऑफिसर सचिन बोरसे यांच्यासह अनेक वरिष्ठ तज्ञांची उपस्थिती होती. शिबिराच्या मुख्य समन्वयक म्हणून डॉ अश्विनी देशमुख यांनी काम पहिले. एसएमबीटी दंत महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी

SMBT

# सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या जन्मशताब्दी निमित्त महाआरोग्य शिबिर



संगमनेर–सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या जन्मशताब्दी निमित्ताने काँग्रेस पक्षाचे नेते माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली संगमनेर शहरातील नागरिकांसाठी रविवार (दि. १९) पासून महाआरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे. १० पेक्षा अधिक प्रभागात या महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले असून जास्तीत जास्त नागरिकांनी शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे. या शिबिराअंतर्गत तज्ञ डॉक्टरांकडून विविध आजारांची तपासणी केली जाणार आहे. या शिबिरात आढळणाऱ्या रुग्णांना पुढील उपचारासाठी एसएमबीटी सेवाभावी हॉस्पिटलमध्ये उपचार करण्यात येणार असल्याची माहिती जयहिंद लोकचळवळीचे संस्थापक मा.आमदार डॉ सुधीर तांबे यांनी दिली. या आरोग्य शिबिराबाबत अधिक माहिती देताना माजी आमदार डॉ तांबे म्हणाले की, तालुक्यातील गोरगरीब ऊसतोड (पान २ वर)

# एसएमबीटी हॉस्पिटलच्या वतीने स्पेशालिटी आणि सुपरस्पेशालिटी आजारांसाठी एकाच छताखाली तपासणी व सल्ला मार्गदर्शन

(पान १ वरुन) कामगार सर्वसामान्य नागरिक यांच्या आरोग्य सुविधांसाठी सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांनी दूरदृष्टीतून एसएमबीटी सेवाभावी ट्रस्टची स्थापना केली. माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली एसएमबीटी हॉस्पिटलच्या माध्यमातून सातत्याने आदिवासी गोरगरीब व सर्वसामान्य नागरिकांसाठी मोफत व माफक दरात उच्च दर्जाच्या आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांची जन्मशताब्दी पूर्ण झाल्याने एसएमबीटी हॉस्पिटलच्या माध्यमातून रविवारपासून संगमनेर शहरातील प्रभाग एकमधील पीजे आंबरेपाटील कन्या विद्यालयात महाआरोग्य तपासणी व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात जन्मजात हृदयविकार, हृदयविकार शस्त्रक्रिया, प्रतिबंधात्मक कर्करोग, मूत्रविकार, किडनी व डायलिसीस, जनरल शस्त्रक्रिया, अस्थिरोग, सांधेदुखी, पोटदुखी, हाडांचे आजार स्त्रियांचे आजार, नेत्ररोग तपासणी व उपचार तसेच आयुर्वेद हॉस्पिटलच्या वतीनेदेखील विविध आजारांवरील रुग्णांची तपासणी केली जाणार आहे. आजाराचे निदान झाल्यानंतर ज्या रुग्णांवर संगमनेर मध्ये उपचार करणे शक्य नाही अशा रुग्णांवर नंदी हिल्स येथील एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये उपचार केले जाणार आहेत. हे महाआरोग्य शिबिर शहरासह, तालुक्यात विविध ठिकाणी होणार असून या शिबिरातून सर्व तरुण, नागरिक, शेतकरी, महिला या सर्वांनी स्वतःची आरोग्य तपासणी व रोग निदान करून घ्यावे असे आवाहनही त्यांनी केले आहे. दरम्यान शहरात एकूण १० पेक्षा अधिक ठिकाणी वेगवेगळ्या दिवशी या शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. या महाआरोग्य शिबिरातून ज्या रुग्णांना पुढील उपचारासाठी एसएमबीटी हॉस्पिटल येथे नेण्याची मोफत सोय करण्यात आली आहे. यामुळे शिबिरातील नागरिकांना मोठा लाभ मिळणार आहे. तज्ञ डॉक्टरांच्या उपस्थित होत असलेल्या आरोग्य तपासणी शिबिरात जास्तीत जास्त नागरिकांनी तपासणी करून घ्यावी असे आवाहन एसएमबीटी हॉस्पिटलच्या वतीने करण्यात आले आहे.